# जोरदार अवकाळी पावसाची हजेरी

## बंगळुरुमध्ये पावसाचा यलो अलर्ट

**बंगळुरू :** देशात अनेक भागातील वातावरणात अचानक बदल झाला आहे. ऐन उन्हाळ्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. बंगळुरूमध्येही अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने, बुधवारी बंगळुरूसाठी मुसळधार पावसामुळे यलो अलर्ट जारी केला आहे. बंगळुरूमध्ये हवाान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. जोरदार वादळी वाऱ्यासह अनेक भागात पावसाची शक्यता आहे.

बंगळुरुमध्ये मुसळधार पावसाची हजेरी

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बुधवारी सकाळपासूनच बंगळुरुमध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली. जोरदार पावसामुळे शहरातच्या अनेक भागात पाणी साचले होते. अनेक भागात पाणी साचल्याने बंगळुरू ट्रॅफिक पोलिसांनी रहदारीमधील अडथळा दूर करत नागरिकांना सूचना दिल्या. यामुळे वाहतुकदारांना दिलासा मिळाला.

पुढील दोन दिवसांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारा

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगळुरुमध्ये पुढील दोन दिवसांत विजांच्या कडकडाटासह वारे वाहण्याची शक्यता आहे. येत्या दोन दिवसांत शहरातील कमाल आणि किमान तापमान ३५ अंश सेल्सिअस आणि २२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहील.

आयएमडीकडून यलो अलर्ट जारी

भारतीय हवामान विभागने २४ तासासाठी बंगळुरुला यलो अलर्ट जारी केला आहे, संभाव्य मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्याचा इशारा देण्यात आला आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, आयटी हब बंगळुरुमध्ये पुढील सात दिवस मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. बंगळुरूच्या हवामान अंदाजानुसार पुढील काही दिवस ढगाळ आकाश आणि पाऊस असं चित्र दिसेल. आठवडाभर सामान्यत: ढगाळ आकाश आणि काही प्रमाणात पाऊस आणि विजांचा गडगडाट अपेक्षित आहे.

बंगळुरूमध्ये आठवडाभर पावसाचा अंदाज

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ८ मे रोजी तापमान २१ ते ३५ अंश सेल्सिअस दरम्यान दिसेल. ९ मे रोजी तापमान २२ ते ३६ अंश सेल्सिअस आणि सामान्यत: ढगाळ आकाशासह हलक्या पावसाचा अंदाज आहे. १० मे ते १३ मे पर्यत तापमान २३ ते ३८ अंश सेल्सिअस दरम्यान राहील, सामान्यत: ढगाळ आकाश आणि हलका पाऊस अपेक्षित आहे. १२ आणि १३ मे रोजी अंशत: ढगाळ आकाशाखाली पाऊस किंवा गडगडाट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, बंगळुरूच्या नागरिकांना संपूर्ण आठवडाभर पावसाची रिमझिम पाहायला मिळणार आहे.

मे महिन्याच्या सुरुवातीपासून बंगळुरुमध्ये पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे आणि परिणामी तापमानात लक्षणीय घट झाली आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला तापमान ३८ अंश सेल्सिअसवरून मंगळवारी शहराचे तापमान ३३.८ अंश सेल्सिअसवर आले. त्यामुळे तापमानात मोठी घट झाली असल्याचं दिसून येत आहे. ७ मे हा महिनाभरातील सर्वात थंड दिवस म्हणून नोंदवला गेला आहे.

## पन्हाळा तालुक्यातील सातार्डे मतदान केंद्रावर अज्ञात इसमा विरोधात गुन्हा दाखल

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** पन्हाळा तालुक्यातील सातार्डे मतदान केंद्रावर अज्ञात इसमाने केलेले मतदान मोबाईलचा वापर करुन व्हिडिओ काढुन सोशल मीडियावर टाकला म्हणून केंद्र प्रमुख बंडा बापु कुंभार यांनी पन्हाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला.

माहिती नुसार, पन्हाळा तालुक्यात लोकसभा मतदान मंगळवारी दिवसभर सुरू होते यातील सातार्डे मतदान केंद्रावरील ५१ सातार्डे या मतदान केंद्रावर अज्ञात इसमाने दुपारी २.३० पुर्वी मतदान करतानाचा व्हिडिओ काढुन मतदान गोपनीयतेचा भंग करत सोशल मीडियावरील इंस्टाग्रामवर टाकून सार्वजनिक केला म्हणून फिर्याद दाखल झाली याचा तपास पोलीस निरीक्षक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सह उपनिरीक्षक

## केजरीवाल यांच्या अंतरिम जामिनावर आदेश

**राजदंड न्युज नेटवर्क :**

कथित अबकारी धोरण घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अंतरिम जामीन मंजूर करण्याबाबत सर्वोच्च न्यायालय १० मे रोजी आदेश देणार आहे.

नवी दिल्ली

कथित अबकारी धोरण घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अंतरिम जामीन मंजूर करण्याबाबत सर्वोच्च न्यायालय १० मे रोजी आदेश देणार आहे.

केजरीवाल यांच्या अटकेविरुद्धच्या याचिकेवर सुनावणी करणाऱ्या खंडपीठाचे नेतृत्व करणारे न्यायमूर्ती संजीव खन्ना म्हणाले, ''आम्ही शुक्रवारी अंतरिम आदेश घोषित करू. अटक करण्याच्या आव्हानाशी संबंधित मुख्य बाबही त्याच दिवशी घेतली जाईल.'' न्यायमूर्ती खन्ना हे बुधवारी न्यायमूर्ती एमएम सुंदरेश आणि न्यायमूर्ती बेला एम त्रिवेदी यांच्यासमवेत वेगळ्या खंडपीठात बसले होते. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एसव्ही राजू यांनी केजरीवाल यांच्या याचिकेच्या यादीबाबत विचारले असता त्यांनी ही टिप्पणी केली. वस्तू आणि सेवा कराशी संबंधित एका प्रकरणात राजू केंद्राच्या वतीने तीन सदस्यीय खंडपीठासमोर हजर झाले होते. केजरीवाल यांच्या याचिकेच्या यादीबाबत त्यांनी स्पष्टीकरण मागितले होते.


७ मे रोजी न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने केजरीवाल यांच्या अंतरिम जामिनावरील निर्णय

# सॅम पित्रोदा यांचा अखेर राजीनामा

**मुंबई :** अखेर इंडियन ओवरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिलाय. भारतीयांबाबत केलेले वर्णद्वेषी वक्तव्य सॅम पित्रोदांना भोवलेय. नॉर्थ-इस्टचे नागरिक चिनी दिसतात. तर दक्षिण भारतीय लोके आफ्रिकन दिसतात, असे वादग्रस्त विधान सॅम पित्रोदा यांनी केले होते. त्यांच्या या विधानावर काँग्रेसनेही आक्षेप नोंदवला होता. त्यानंतर पित्रोदांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी ट्विट करून ही माहिती दिली. निवडणुकीच्या वेळी वादग्रस्त वक्तव्य केल्याने आता काँग्रेस बॅकफूटवर जाणार का? असा प्रश्न देखील विचारला जात आहे.

काँग्रेस अन् मित्रपक्ष नाराज

सॅम पित्रोदा यांनी भारताच्या विविधतेबद्दल दिलेली उपमा चुकीची



आणि अस्वीकार्य आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्वत:ला यापासून पूर्णपणे अलिप्त ठेवते, असं जयराम रमेश यांनी म्हटलं आहे. तर काँग्रेसच्या मित्रपक्षांनी देखील सॅम पित्रोदा यांच्या वक्तव्यावर टीका केली. मी त्यांच्या विधानाशी सहमत नाही. पण ते जाहीरनामा समितीचे सदस्य आहेत, काँग्रेसचे स्टार प्रचारक आहेत आणि ते या देशात राहतात का? ते परदेशात राहतात, असं प्रियांदा चतुर्वेदी यांनी म्हटलं आहे.

नरेंद्र मोदींची टीका

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेलंगणातील वारंगलमध्ये सभा घेत असताना सॅम पित्रोदा यांच्यावर टीकास्त्र सोडलं. त्यांच्या तत्वज्ञानाने कातडीच्या आधारे देशवासीयांचा अपमान केला. शिवीगाळ केली. आज मला खूप राग आलाय. लोकांनी मला शिव्या दिल्या तरी चालतील, पण असं विधान मला सहन झालं नाही. माझ्या देशातील लोकांच्या त्वचेच्या रंगावरून त्यांची गुणवत्ता ठरवली जाईल का? कातडीच्या रंगाचा खेळ खेळण्याचा अधिकार त्यांना कोणी दिला? संविधान डोक्यावर घेऊन नाचणारे लोक माझ्या देशाचा अपमान करत आहेत, अशी टीका नरेंद्र मोदी यांनी केली आहे.

वारसा कर अन् वाद

दरम्यान, अमेरिकेतील शिकागोमध्ये बोलताना पित्रोदा यांनी तेथील एक करप्रणाली भारतामध्येही लागू करण्यासंदर्भात विचार करता येईल का याबद्दलची चाचपणी करण्याची गरज असल्याचं म्हटलं होतं. अमेरिकेमध्ये वारसा कर नावाची एक पद्धत आहे. या करप्रणालीनुसार जर एखादी व्यक्ती १० कोटी डॉलर्सहून अधिक संपत्तीची मालक असेल तर तिलाच हा कर लागू होतो. १० कोटी डॉलर्सहून किंवा त्याहून अधिक मालमत्ता नावावर असताना एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्या संपत्तीपैकी केवळ ४५ टक्के संपत्ती या व्यक्तीच्या मुलांना हस्तांतरित करू शकतो, असे वक्तव्य सॅम पित्रोदा यांनी केले होते. त्यावेळी देखील भाजपने जोरदार टीका करत काँग्रेसला निशाण्यावर घेतले होते.

# एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे

## २५ बडतर्फ कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचं कंपनीकडून आश्वासन

**राजदंड न्युज नेटवर्क** :आजरपणाचे कारण देत एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांनी अचानकपणे संप पुकारला होता. त्यामुळे या कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई करत एअर इंडियाने २५ कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले होते. मात्र, आता कंपनीने दिलेल्या आश्वासनानंतर या कर्मचाऱ्यांनी त्यांचा संप मागे घेतला आहे. तसेच २५ बडतर्फ कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचे आश्वासन एअर इंडिया प्रशासनाकडून देण्यात आले आहे.




दरम्यान, बुधवारी एअर इंडिया एक्सप्रेसच्या तब्बल ३०० कर्मचाऱ्यांनी आजारपणाचे कारण पुढे करत सामूहिक सुट्टी घेतली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांनी एकाचवेळी सुट्टी घेतल्यामुळे अनेक उड्डाणे रद्द करण्याची वेळ कंपनीवर आली होती. तर काही विमानांचे उड्डाणे पुढे ढकलण्यात आले होती. या गोंधळामुळे प्रवाशांनाही नाहक त्रास सहन करावा लागला होता. त्यानंतर या एअर इंडियाने या कर्मचाऱ्यांविरोधात कारवाई करत २५ कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याचा निर्णय घेतला होता.

सामूहिक सुट्टी घेतलेल्या या कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या व्यवस्थापनाकडे काही मागण्या मांडल्या होत्या. त्यामध्ये वेतनवाढीसह आदी महत्वाचे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. मात्र, कंपनीने यावर गांभीर्याने विचार न केल्याने अचनाक ३०० कर्मचाऱ्यांनी आजारी असल्याचे कारण सांगत सुट्टी घेतली होती.

दरम्यान, गुरुवारी एअर इंडियाचे अधिकारी-कर्मचारी आणि मुख्य कामगार आयुक्त त्यांच्यात बैठक पार पडली. या बैठकीदरम्यान एअर इंडियाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर विचार करण्याचे मान्य केले. तसेच सर्व बडतर्फ कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचेही आश्वासन दिले.

# राहुल गांधींची गॅरंटी; देशातल्या तरुणांना काँग्रेसचा 'हा' खास संदेश

**राजदंड न्युज नेटवर्क :** लोकसभा निवडणुकीच्या आखाड्यात आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी विविध सभेत बोलताना काँग्रेसवर हल्लाबोल करत आहेत. नरेंद्र मोदी यांच्या टीकेला काँग्रेस नेते राहुल गांधी प्रत्युत्तर देत आहेत. निवडणुकीचे वातावरण तापलेले असतानाच राहुल गांधी यांनी मोठा दावा केला आहे. लोकसभा निवडणुकीचे निकाल ४ जून रोजी जाहीर होतील, तेव्हा इंडिया आघाडीला बहुमत मिळेल. ही निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातातून निसटत आहे, असे राहुल गांधींनी म्हटले आहे.

राहुल गांधी नेमकं काय म्हणाले?

देशातील तरुणांनो! ४ जून रोजी देशात इंडिया आघाडीचे सरकार स्थापन होत आहे. आम्ही तुम्हाला गॅरंटी देत आहोत की, १५ ऑगस्टपर्यंत ३० लाख रिक्त सरकारी पदांवर भरतीचे काम सुरू करू, असं आश्वासन राहुल गांधींनी देशातील युवकांना दिलं. याचवेळी राहुल गांधी यांनी देशातील युवकांना एक सल्लाही दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खोट्या प्रचाराने विचलित होऊ नका, आपल्या मुद्द्यांवर ठाम राहा. इंडिया आघाडीचे ऐका, द्वेष करू नका आणि नोकरी निवडा. असे राहुल गांधी म्हणाले आहेत. यासंदर्भात राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट करत



भारतीय जनात पार्टी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी खोटं बोलले**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं होतं की, दोन कोटी तरुणांना रोजगार देण्यात येईल. मात्र, ते खोटं बोलले होते. त्यांनी नोटबंदी केली. जीएसटी चुकीच्या पद्धतीने लावला. मोदी सरकार उद्योगपती अदानी यांच्यासारख्या लोकांसाठी काम करत आहे. मात्र,आम्ही भरती भरोसा स्किम आणत आहोत. देशात ४ जून रोजी इंडिया आघाडीचं सरकार येत आहे आणि १५ ऑगस्टपर्यंत ३० लाख तरुणांना रोजगार देण्याचं काम सुरु होईल, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

नरेंद्र मोदी हे भारताचे पंतप्रधान होणार नाहीत, असा दावा राहुल गांधी यांनी केला. देशात आतापर्यंत झालेल्या निवडणुकीच्या तीन टप्प्यांच्या अंदाजावरून राहुल गांधी यांच्यासह काँग्रेस पक्षाच्या नेत्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. मात्र, दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपाने ४०० पार खासदारांचा संकल्प केला आहे. तसेच भाजपाचे नेते प्रत्येक सभेत बोलताना ४०० पारचा नारा देत आहेत. एकीकडे भाजपाचा ४०० पार खासदारांचा नारा आणि दुसरीकडे इंडिया आघाडीचे सरकार सत्तेत येत असल्याचा राहुल गांधींचा विश्वास, हे पाहता देशात नेमकी सत्ता कोणाची येणार हे ४ जून रोजी स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, देशात लोकसभा निवडणूक एकूण सात टप्प्यांत होत असून यामध्ये १९ एप्रिल, २६ एप्रिल आणि ७ मे रोजी अशा तीन टप्प्यांतील निवडणुका पार पडल्या आहेत. यानंतर आता पुढच्या राहिलेल्या टप्प्यांतील मतदानासाठी इंडिया आघाडी आणि भाजपामध्ये चुरस निर्माण झाली आहे. त्यामुळे देशवाशियांचे लक्ष हे ४ जूनच्या निकालाकडे असणार आहे.

# रफाह सीमेला लागून असलेल्या गाझा पट्टीच्या दक्षिण भागावर इस्रायलचा ताबा

**राजदंड न्युज नेटवर्क :** रफाह सीमा आणि इजिप्तला लागून असलेल्या गाझा पट्टीच्या दक्षिण भागावर इस्रायली सैन्याने ताबा मिळवला असल्याची माहिती इस्रायली सैन्याकडून देण्यात आली आहे. तसेच या कारवाई दरम्यान २० दहशतवाद्यांचा मृत्यू झाल्याचेही इस्रायलकडून सांगण्यात आलं आहे.

द इंडिनय एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, इस्रायली सैन्याने सोमवारी रात्री रफाह बॉर्डरला लागून असलेल्या गाझा पट्टीच्या दक्षिण भागावर सैन्य कारवाई केली. या कारवाईदरम्यान हमासचे २० दहशतवादी मारले केले. तसेच इस्रायली सैन्याने तीन बोगदेदेखील उधवस्त केले. या कारवाईनंतर आता इस्रायलने गाझा पट्टीतील दक्षिण भागावर नियंत्रण मिळवले आहे.




महत्त्वाचे म्हणजे इस्रायली माध्यमांमध्ये प्रसारीत झालेल्या एका व्हिडीओत या भागात इस्रायलचे झेंडेही दिसून आले आहेत.

मात्र, इस्रायली सैन्याने यासंदर्भात बोलण्यास नकार दिला आहे. यासंदर्भात बोलताना इस्रायलच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की आम्ही रफाह सीमेला लागून असलेल्या दक्षिण गाझा पट्टीवर नियंत्रण मिळवले आहे. तसेच या भागातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे.

दरम्यान, इस्रायल आणि हमास यांच्यात सुरु असलेल्या युद्धाला आता सात महिने पूर्ण होत आहेत. इस्रायलच्या हल्ल्यामध्ये आतापर्यंत ३४ हजार ६०० पेक्षा जास्त पॅलेस्टिनी ठार झाले आहेत आणि जवळपास ७८ हजार जखमी झाले आहेत.

गाझाच्या २३ लाख लोकसंख्येपैकी जवळपास १४ लाख लोक विस्थापित होऊन एकट्या रफाह या दक्षिणेकडील शहरामध्ये एकवटले आहेत. हमासने ७ ऑक्टोबरला केलेल्या हल्ल्यात जवळपास १२०० जणांचा बळी गेला. त्याशिवाय २५३ जणांना ओलिस धरण्यात आले. त्यापैकी सुमारे १३० जणांची अजूनही काही खबरबात नाही. विशेष म्हणजे दीर्घकाळ युद्धविराम व्हावा यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मात्र, त्याला अद्याप यश आलेले नाही.

# सुनीता विल्यम्स यांची अंतराळ मोहीम स्थगित, तांत्रिक बिघाडामुळे शेवटच्या क्षणी उड्डाण रद्द



**राजदंड न्युज नेटवर्क :** प्रक्षेपकातील तांत्रिक बिघाडामुळे बोइंगला आपली पहिलीवहिली अंतराळ मोहीम सोमवारी रात्री (अमेरिकी प्रमाणवेळेनुसार) स्थगित करावी लागली. मूळ भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांच्यासह बूच विल्मर या मोहिमेत सहभागी होणार होते. तांत्रिक समस्या दूर झाल्यास 'स्टारलायनर' अंतराळयान शुक्रवारपर्यंत अवकाशात झेपावू शकेल, असे 'बोइंग'ने म्हटले आहे.

बोइंगचे 'स्टारलायनर' अंतराळयान फ्लोरिडा येथील केप कॅनव्हेराल येथून आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने अवकाशात झेपावणार होते. भारतीय प्रमाणवेळेनुसार मंगळवारी सकाळी आठ वाजून चार मिनिटांनी हे उड्डाण होणार होते. यासाठी सुनीता व विल्मर यांनी उलटगणती संपल्यानंतर उड्डाणापूर्वी दोन तास या अंतराळयानाच्या कॅप्सूलमध्ये प्रवेश केला. मात्र, या अंतराळयानास घेऊन जाणाऱ्या ॲटलास प्रक्षेपकाच्या वरील भागातील झडपेत मोठ्या प्रमाणात बिघाड निर्माण झाल्याचे निदर्शनास आले. 'ऑक्सिजनच्या दाबाचे नियमन करणारी ही झडप वारंवार उघडबंद होऊ लागली व त्यातून मोठा आवाजही येत होता,' अशी माहिती 'युनायटेड लाँच अलायन्स'चे सीईओ टोरी ब्रुनो यांनी दिली.

# रशियाचा विजय दिवस साजरा:९ हजार सैनिक, ७० रणगाड्यांचा समावेश

**राजदंड न्युज नेटवर्क :** गुरुवारी (९ मे) रशियामध्ये ७९ वा विजय दिवस साजरा करण्यात आला. या दिवशी दुसऱ्या महायुद्धात सोव्हिएत युनियनने नाझी जर्मनीचा पराभव केला. पुतिन क्रेमलिनवरून रेड स्क्वेअर येथे पोहोचले, जिथे परेड आयोजित केली होती. राष्ट्राला संबोधित करताना पुतिन म्हणाले की, रशियाला जगात युद्धाला प्रोत्साहन द्यायचे नाही, पण आम्हाला कोणीही धमकावू शकत नाही. त्यांनी पाश्चिमात्य देशांना इशारा देत रशियाचे सैन्य युद्धासाठी सदैव तयार असल्याचे सांगितले.

विजय दिनाच्या परेडमध्ये ९ हजारांहून अधिक सैनिकांनी भाग घेतला. युक्रेनमध्ये



लढलेले सैनिकही त्यात सहभागी झाले होते. परेडमध्ये ७० हून अधिक रणगाडे आणि चिलखती वाहने दिसली. यामध्ये इस्कंदर-एम बॅलिस्टिक क्षेपणास्त्र, ड-४०० एअर डिफेन्स सिस्टम आणि यार्स इंटरकॉन्टिनेंटल बॅलिस्टिक क्षेपणास्त्रासह २ महायुद्धात वापरलेल्या ढ-३४ रणगाड्यांचा समावेश होता.

गेल्या वर्षी खराब हवामानामुळे फ्लायबाय रद्द करण्यात आला होता. ही परेड अशा वेळी होत आहे, जेव्हा रशिया युक्रेनसोबत खडतर युद्धाला तोंड देत आहे. अमेरिकेच्या संरक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या युद्धात आतापर्यंत १ लाख रशियन सैनिक मारले गेले आहेत.

व्लादिमीर पुतिन यांनी दुसऱ्या महायुद्धात शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहिली.

व्लादिमीर पुतिन यांनी दुसऱ्या महायुद्धात शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहिली.

पाश्चात्य देश दुसऱ्या महायुद्धाचे धडे विसरत आहेत. आम्हाला आठवते की तेव्हा मॉस्को, लेनिनग्राड, रझेव्ह, स्टॅलिनग्राड, कुर्स्क, खार्किव, कीव आणि क्राइमियासाठी रक्तरंजित लढाया लढल्या गेल्या. नाझी जर्मनीने रात्री ११:०१ वाजता बिनशर्त आत्मसमर्पण केले. पुतिन यांनी जपानविरुद्ध चिनी जनतेच्या लढ्याचेही स्मरण केले.

पुतिन म्हणाले की, देश कठीण काळातून जात आहे. आपल्या मातृभूमीचे भविष्य आपल्यावर अवलंबून आहे.

गर्विष्ठ पाश्चिमात्य देश जगाला युद्धात ढकलण्याचा प्रयत्न करत आहेत. रशिया हे होऊ देणार नाही. आमची अण्वस्त्रे नेहमी वापरासाठी तयार असतात.

पुतिन ताजिकिस्तानचे अध्यक्ष इमोमाली रहमोन (उजवीकडे) आणि पाच माजी सोव्हिएत देशांच्या नेत्यांसह विजय दिनाच्या परेडला उपस्थित होते.

पुतिन ताजिकिस्तानचे अध्यक्ष इमोमाली रहमोन (उजवीकडे) आणि पाच माजी सोव्हिएत देशांच्या नेत्यांसह विजय दिनाच्या परेडला उपस्थित होते.